www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार




मुख्य संपादक - भारती संतोष आमले   उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील   सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २   अंक : 323   गुरुवार दि. 07 ऑगस्ट २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : 6   RNI MAHMAR/2023/89514

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह व संत एकनाथ मागासवर्गीय वसतिगृहाचा उदघाट्न सोहळा संपन्न

## राज्यात १२० वसतिगृहे उभारली जाणार २५ हजार विद्यार्थ्यांना निवासी सुविधा उपलब्ध होणार सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट









दैनिक युवक आधार
संतोष आमले संपादक : सामाजिक न्याय विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाची वसतिगृहे उभारण्याचा महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. राज्यभरात एकूण १२० ठिकाणी वसतिगृहे उभारली जाणार असून, यामुळे सुमारे २५ हजार विद्यार्थ्यांना निवासी सुविधा उपलब्ध होणार आहेत. वसतिगृहासाठी शासनाने १२०० कोटी रुपयांची तरतूद केली असल्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी प्रतिपादन केले. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह युनिट १, २, ३ व संत एकनाथ मागासवर्गीय मुलांचे वसतिगृहाच्या नूतन इमारतींचा उदघाट्न सोहळा चेंबूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्यमंत्री तथा पालकमंत्री, मुंबई उपनगर अड. आशिष शेलार, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार तुकाराम काते, समाज कल्याण आयुक्त बाबासाहेब बेलदार, प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग वंदना कोचुरे उपस्थित होते. मंत्री श्री. शिरसाट म्हणाले, ज्या ठिकाणी माझा जन्म झाला, तिथे वसतिगृहाचे उद्घाटन करण्याचा योग मला आला आहे. हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे. हे उभारण्यात आलेले वसतिगृह ही फक्त वास्तू नव्हे तर विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठीचा एक संकल्प आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला "शिका आणि संघटित व्हा" हा संदेश, हीच खरी प्रेरणा आहे जी आपल्याला स्वतःच्या पायावर उभ राहण्यासाठी आवश्यक असलेल बळ देते. शिक्षण हे सामाजिक, आर्थिक आणि वैयक्तिक प्रगतीच शक्तिशाली साधन आहे. डॉ.बाबासाहेबांनी दिलेला हा मंत्र स्वीकारूनच आपण आत्मनिर्भर, सशक्त आणि न्याय्य समाज घडवू शकतो. विद्यार्थ्यांना उद्देशून बोलताना ते म्हणाले,भविष्यात तुमच्यामुळे तुमच्या पालकांची समाजात ओळख निर्माण झाली पाहिजे.असे शिक्षण घ्या. स्वतःची ओळख निर्माण करा. आमदार तुकाराम काते यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. यावेळी सहाय्यक आयुक्त मुंबई उपनगर रविकिरण पाटील, सहाय्यक आयुक्त ठाणे समाधान इंगळे, सहाय्यक आयुक्त रायगड सुनील जाधव, सहाय्यक आयुक्त वर्षा चव्हाण तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी, विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

मंत्री अड. शेलार म्हणाले, या वसतिगृहातून बाहेर पडणारे विद्यार्थी भविष्यात समाजात मानाचे स्थान मिळवतील, हीच अपेक्षा आहे. वसतिगृहातून शिकून विद्यार्थी आयएएस, आयपीएस, न्यायाधीश, डॉक्टर, इंजिनीयर झाले आणि काही वर्षांनी याच प्रांगणात त्याचा कौतुक सोहळा झाला, तर तो क्षण मला पाहायला नक्कीच आवडेल.

राज्यमंत्री श्रीमती मिसाळ म्हणाल्या, मुंबईसारख्या वर्दळीच्या शहरात शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणे ही एक मोठी संधी आहे. विद्यार्थ्यांनी या संधीच सोन करावे. आई-वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी मेहनत घ्यावी. विद्यार्थ्यांनी कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम आत्मसात करण्याचा सल्ला त्यांनी यावेळी दिला.

---

# सोमवार आठवडा बाजाराच्या गर्दीमुळे ट्रॅफिकची वाढती समस्या

दैनिक युवक आधार
मुंबई प्रतिनिधीः प्रविणभाऊ पवार
मुंबई उपनगर खार पुर्व जवाहर नगर येथील तिनं बंगला रेल्वे कॉलेनी जयप्रकाश नारायण मार्ग ते गोळीबार नाका संत गाडगेबाबा मार्गावर काही वर्षांपासून दर सोमवारी आठवड्याचा बाजार दुपारी ४:०० ते रात्री १०:०० वाजेपर्यंत भरलेला असतो. पुर्वी या मार्गावर एक बाजू पकडून छोटे व्यावसायिक आपला धंदा लावत असे परंतु आता ते मार्गाच्या दोन्ही बाजूला आपला बाजार मांडून चक्का जाम केला आहे. पण हा मार्ग पाहिजे तसा मोठा नसल्यामुळे अनेक तक्रारींचा सामना करावा लागतो. सुरुवातीला छोटा वाटणारा सोमवारचा आठवडा बाजार आता मोठ्या प्रमाणात वाढू लागला आहे.मार्गावर दुरवरचे छोटे व्यावसायिक येत असून आपला माल विकण्यासाठी जिथे जागा मिळेल तिथे आपला थांड मांडून माल पसरुन विकत आहेत. या मध्ये स्थानिक व्यावसायिक कमी असून बाहेरुन येणारी संख्या जास्त आहे. खार पुर्व जवाहर नगर हा तसा स्लम एरिया आहे. येथील बहुसंख्य लोक झोपडपट्टी मध्ये राहणारे सर्वसाधारण नागरिक आहेत. हा मार्ग खुप अरुंद आहे. येथील लोकवस्ती जास्त असल्यामुळे



नेहमीच या मार्गावर गर्दी गजबजलेला जास्त प्रमाणात असतोा मार्गाच्या दोन्ही बाजूला पूर्वीपासूनच मोटार, टू व्हीलर, हातगाड्या पार्किंग केलेल्या असतात तसेच फेरीवाल्यांमुळे रस्त्यावरील गर्दीमुळे तक्रारी वाढल्या आहेत. त्यात हा सोमवारच्या आठवडा बाजाराची भर या बाजार हे अनधिकृत बाजाराची संख्या दिवसेंदिवस वाढत आहेत. वाढते अतिक्रमण, नागरिकांना होणारा नाहक त्रासाचा सामना करावा लागत आहे. एच पुर्व पालिका व स्थानिक निर्मल नगर पोलीस स्थानकांपैकी कोणाचेही नियंत्रण नाही. सोमवार आठवडा बाजारासाठी एक स्वतंत्र जागा निर्माण करुन द्यावी किंवा बाजार बंद करावा. नाहीतर एक मार्गी बसण्यासाठी सुचना करावी. फिरते पथक चालू करुन नागरिक व वाहनांना होणाऱ्या त्रासापासून दिलासा द्यावा. अशी स्थानिक नागरिकांन कडून होत आहे.

---

# सत्याच्या लढ्यातील लेखणीचा सन्मान : संपादक ज्ञानेश्वर बुधवत यांना 'समाज रत्न पुरस्कार' देऊन गौरव

दैनिक युवक आधार
शेवगाव वार्ताहर
\- दैवत फाउंडेशन, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य आणि प्रेरणादायी सन्मान सोहळ्यात दैनिक लोकनेता या नामवंत दैनिकाचे मुख्य संपादक श्री. ज्ञानेश्वर बुधवत यांना 'समाज रत्न पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदान, सामाजिक बांधिलकी आणि ग्रामीण जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. हा भव्य सोहळा एक केवळ सन्मानाचा कार्यक्रम न राहता, समाजहितासाठी कार्य करणाऱ्या पत्रकारतेचा आदर्श निर्माण करणारा ठरला. विविध क्षेत्रांतील नामवंत मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ, आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या पुरस्काराचे विशेषत्व असे की, महाराष्ट्रातील ख्यातनाम मान्यवरांच्या हस्ते श्री. बुधवत यांना प्रदान करण्यात आला. पुरस्कार प्रदान करणाऱ्या प्रमुख मान्यवरांमध्ये – श्री. अरुणभाऊ मुंडे (महाराष्ट्र प्रदेश चिटणीस, भारतीय जनता पक्ष), मा. डॉ. सुनिलभाऊ कायंदे (प्रदेश उपाध्यक्ष, भाजपा ओबीसी मोर्चा),उद्योगरत्न भीमरावजी फुंदे, मा. दत्ताभाऊ बारगजे (आनंदग्राम इन्फर्ट इंडिया, पाली बीड), ह.भ.प. सुदर्शन महाराज शास्त्री (श्री क्षेत्र आळंदी), श्री. गोकुळभाऊ दौंड, श्री. नंदकुमार मुंडे, श्री. अविनाश बुधवंत (डीवायएसपी), श्री. उदयभाऊ मुंडे,श्री. संजय नागरेहे मान्यवर प्रमुख उपस्थित होते व त्यांच्या हस्ते अत्यंत थाटामाटात पुरस्कार प्रदान करण्यात आला. ज्ञानेश्वर बुधवत यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले. यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना त्यांच्या निर्भीड, सडेतोड आणि सामाजिक भान असलेल्या पत्रकारितेचे मनापासून कौतुक केले स्वतः श्री. बुधवंत यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "हा पुरस्कार माझ्यासाठी वैयक्तिक




गौरव नसून, ग्रामीण पत्रकारितेच्या मूल्यांना मिळालेला सन्मान आहे. दाबल्या गेलेल्या आवाजांना न्याय मिळावा, हा माझा पत्रकारितेचा मूलमंत्र आहे. हा सन्मान मला आणखी जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे." कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी पद्धतीने पार पडले. ग्रामस्थ, पत्रकार मित्र आणि मान्यवरांनी दिलेल्या ऊर्जेने संपूर्ण वातावरण भारून गेले होते. कार्यक्रमाच्या समारोपाला सर्वांनी संपादक श्री. बुधवंत यांचे हार्दिक अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

हा पुरस्कार आणि त्यामागील दृष्टीकोन हे निश्चितच ग्रामीण पत्रकारितेला बळ देणारे असून, समाजासाठी झटणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या कार्याला दैवत फाउंडेशनने दिलेला हा सन्मान प्रेरणास्त्रोत ठरला आहे.

---

# दुंदरे ग्रामपंचायत उपसरपंच पदी महेश महादू पाटील यांची बिनविरोध निवड

दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी
– दुंदरे ग्रुप ग्रामपंचायत थेट सरपंच सुभाष शेठ भोपी यांच्या नेतृत्वाखाली गेले तीन वर्ष विकासाची कामात चा डोंगर उभा केला असून शेतकरी कामगार पक्षाने ठरवून दिल्याप्रमाणे सदस्यांना १ वर्षी उपसरपंच पदीभार देण्याचे ठरले असून या सूत्रानुसार सरपंच सुभाष शेठ भोपी यांच्या नेतृत्वाखाली उपसरपंच शितल कैलास भोपी यांनी ठरवून दिलेल्या कार्यकाळात आपला राजीनामा दिल्यानंतर आज बुधवार दिनांक 6 ऑगस्ट रोजी ग्रामविकास अधिकारी यांच्या कडे विलास फडके सुभाष भोपी यांच्या उपस्थित महेश पाटील यांचा उपसरपंच पदासाठी अर्ज दाखल केल्याने त्यांच्या अर्जाला सर्व कमिटीची संमती मिळाल्याने कोणीही विरोधात अर्ज न भरल्याने ग्रामविकास अधिकाऱ्यांनी महेश महादू पाटील यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली यावेळी महेश पाटील यांना उपसरपंच पदी निवड झाल्याने शेतकरी कामगार पक्षाचे पंचायत समिती माजी सभापती काशिनाथ पाटील उपसभापती राजेश केनी रायगड जिल्हा परिषद सदस्य विलास फडके कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक नारायण शेठ घरत शेखर शेळके आदी मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या तसेच थेट सरपंच सुभाष भोपी मावळते उपसरपंच शितल भोपी व सर्व कमिटीने त्यांना शुभेच्छा दिल्या यावेळी उपस्थित मान्यवर कृषी उत्पन्न बाजार समिती माजी संचालक रायगड भूषण महादेव गायकर, रायगड भूषण माजी सरपंच भारत भोपी,कैलास भोपी, दिलीप उलवेकर गोपीनाथ फडके संजय गवळी, पंढरीनाथ भोपी, गोपीनाथ पाटील, जनार्दन सिनारे, भीमा गोसावी बाळाराम गवळी विष्णू शेळके सदानंद धरणेकर, रवी शेळके, विठ्ठल पाटील आदी मंडळी उपस्थित होते





---

# सिद्धेश्वर मंदिर ,करडखेड येथील महादेव मंदिरापासून थेट उपजिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पदयात्रा

## शिवसेनेच्या वतीने शेतकऱ्यांची कर्जमाफीसह इतर मागण्यासंदर्भात हणेगाव ते देगलूर पदयात्रा काढून उपजिल्हाधिकारी यांना निवेदन सादर

दैनिक युवक आधार
तालूका प्रतिनिधीः महादेव उप्पे

–देगलूर(दि.०७) शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर यांच्या नेतृत्वाखाली व शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांच्या आदेशानुसार दि.०४ ऑगस्ट २०२५ रोज सोमवारी हणेगाव ते देगलुर उपजिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पदयात्रा काढुन दि.०५ ऑगष्ट २०२५ मंगळवार रोजी शेतकऱ्यांची संपुर्ण कर्जमाफी,शेतकऱ्यांना वृद्धपकाळात मानधन मिळणे व निराधार मानधणात वाढ करणे,देगलुर ते हणेगाव,मानुर रस्त्याचे काम तातडीने करणे,सोयाबीन पिकाला वाढीव दर मिळणे,हणेगाव येथे राष्ट्रीय बँक शाखा सुरु करावे,जलजीवन मिशन योजनेअंतर्गत कामे त्वरीत पुर्ण करावे,आदी मागण्या शासन दरबारी पोहचवण्यासाठी पवित्र श्रावन महीण्याच्या दुसऱ्या सोमवारी टाळ व मृदंगाच्या गजरात हरहर महादेवाच्या जयघोषात वरील मागण्यांसाठी शेतकरी मजुरकार कष्टकरी शिवसेना उबाठा गट व मित्रपक्षाच्या सहकार्याने हणेगाव येथील सिद्धेश्वर मंदीरापासुन पदयात्रेस सुरुवात करण्यात आली असून हणेगाव बसस्थानकावर शिवसेना व मित्रपक्षाचे नेतेमंडळींनी या भाजप सरकाच्या धोरणावर आपला रोष व्यक्त करीत विविध मागण्यांचा पाढा वाचला आणि शेतकऱ्यांच्या सन्मानात शिवसेना मैदानात जयघोषात भजन किर्तन करत देगलूरकडे यात्रेला सुरुवात केली.श्रावन सोमवार निमीत्त वाटेतील करडखेड महादेव मंदीरात मुक्काम करुन दुसऱ्या दिवशी म्हणजे दि.०५ ऑगस्ट २०२५ रोजी देगलुर येथे पोहचुन उपजिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन वरील विवीध मागण्याचे निवेदन सादर करण्यात आले.



यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख महेश पाटील,जिल्हा संपर्क प्रमुख दयाल गीरी,तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे,उपतालुका प्रमुख उत्तम अन्सापुरे,दिलीप ईनामदार,विवेक पडकंठवार,कांग्रेस पक्षाचे हज्जुसेठ चमकुडे,राष्ट्रवादी पक्षाचे अमोल देशमुख,डॉ.विजयकुमार धुमाळे,दिलीप बंदखडके,खुतमापूर ग्रामपंचायतीचे सरपंच बालाजी चोपडे,प्रविण ईनामदार,प्रशांत पाटील,भागवत पाटील सोमुरकर,हणेगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच मुजिपोदिन चमकुडे, ग्रामपंचायत सदस्य वसंत आडेकर, यादव सुर्यवंशी,कैलास येसगे,किशोर आडेकर,सुधाकर टोके आदीजन उपस्थित होते. यावेळी अनुचीत प्रकार घडु नये म्हणुन मरखेल ठाण्याचे प्रमुख रविंद्र हुंडेकर,विलास पवार,दत्तात्रय पाटील यांनी चोख बंदोबस्त ठेवले होते तर प्राथमिक आरोग्य केंद्राकडून अँबुलन्सची व्यवस्था करण्यात आली होती.

# कांदळवन नष्ट, बेकायदा बांधकाम : जेएसडब्ल्यूच्या अनियमिततेवर विधानसभेच्या उपाध्यक्षांकडून ठपका

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**



राज्यातील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर विधानभवनात मंगळवारी (दि. ५ ऑगस्ट) एक महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत डोलवी (ता. पेण, जि. रायगड) येथील जेएसडब्ल्यू कंपनीने पर्यावरणाच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील असलेले कांदळवन नष्ट करणे आणि सरकारी जमिनीवर केलेले बेकायदेशीर बांधकाम या मुद्द्यांवर कडक शब्दांत गंभीर दखल घेण्यात आली. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस आमदार सना मलिक आणि आमदार सुनील प्रभू प्रमुख उपस्थित होते. महाराष्ट्रातील प्रदूषणाचा पातळी गाठलेला गंभीर टप्पा लक्षात घेता तातडीने कठोर उपाययोजना राबवण्यावर भर देण्यात आला.

JSW ने काय केलं?अलिबाग तालुक्यातील मौजे जुई बापूजी, सर्वे नं. ५०-'ड', क्षेत्र १.८४ हे.आर. या राखीव वनजमिनीवर जेएसडब्ल्यू कंपनीने अतिक्रमण करून, मातीचा भराव, संरक्षक भिंतीचे बांधकाम, सिमेंट काँक्रिटचे कन्व्हेअर बेल्टचे फाउंडेशन तयार केल्याचे वन विभागाच्या अहवालात स्पष्ट झाले आहे.

उपवनसंरक्षक, अलिबाग आणि उपअधीक्षक, भूमिअभिलेख कार्यालय यांनी जिल्हाधिकारी रायगड यांना सादर केलेल्या अहवालात, कंपनीने निसर्गाला सुरुंग लावत अनधिकृतरित्या प्रकल्प विस्ताराचे काम सुरू केल्याची स्पष्ट नोंद आहे.

"कंपनीला बैठक घेऊन सुनावणीचा इशारा"

या संपूर्ण प्रकाराची गांभीर्याने दखल घेत, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी जेएसडब्ल्यू कंपनीच्या व्यवस्थापनासोबत तातडीने बैठक घेऊन खुलासा मागविण्याचे निर्देश दिले आहेत. "पर्यावरणाची आणि जनतेच्या हक्कांची पायमल्ली सहन केली जाणार नाही," असे स्पष्ट शब्दांत सांगत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना या अनियमिततेबाबत चौकशी करण्याचे आदेश दिले. कंपनीच्या अनियमिततेवर सरकारचा झणझणीत चाप

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी संपूर्ण राज्यभरात सरकार सक्रिय होत असताना, कार्पोरेट कंपन्यांकडून असा बेजबाबदारपणा आणि बेकायदेशीर भूमी अतिक्रमण म्हणजे जनतेच्या भावनांची आणि कायद्याची सरळसरळ थट्टा आहे. जेएसडब्ल्यू कंपनीला आता या प्रकाराचा लेखी खुलासा द्यावा लागणार आहे.*"जेएसडब्ल्यू कंपनीने डोलवी येथे नष्ट केलेल्या कांदळवनामुळे पर्यावरणाची मोठी हानी झाली असून, याप्रकरणी शासनाने आता स्पष्ट भूमिका घेतली आहे. पुढील काही दिवसांत कंपनीच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे."*

# पनवेल तहसील कार्यालयातर्फे निराधारांना आधार





**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करुन आधार मॅपिंग करुन शासकीय अनुदानाचे लाभ मिळवून देण्यात आला. ५ रोजी तहसिलदार पनवेल कार्यालयातील सर्व मंडळामध्ये महसूल सप्ताह विशेष कार्यक्रमांतर्गत सर्व ग्राम महसूल अधिकारी यांनी संजय गांधी लाभार्थी यांचे घरोघरी भेटी देऊन डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना अधार मॅपिंगची प्रक्रिया पुर्ण करण्यात आली. तसेच IN ACTIVE आधार असलेल्या लाभार्थ्यांना आधार केंद्रावर नेऊन आधार मॅपिंग करण्यात आले. पनवेल तालुक्यात एकूण 302 लाभार्थी यांना या मोहिमेचा लाभ प्राप्त झाला. सर्वसमावेशक व संवेदनशील प्रशासनाची घरपोच जनसेवा, उपेक्षितांसाठी सृजनशील हात" संजय गांधी निराधार योजना, विधवा सहाय्यता, श्रावणबाळ निवृत्तीवेतन योजना यांसारख्या शासकीय योजनांचा लाभ लाभार्थ्यांच्या घरी पोहोचवण्यासाठी एक सृजनशील आणि संवेदनशील उपक्रम राबविण्यात आला

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी कोकणस्थ म्हादे प्रतिष्ठाणचा मोलाचा पुढाकार...




दैनिक युवक आधार
राजापूरः- (प्रमोद तरळ)

शिक्षणाच्या वाटचालीत साधनांची कमतरता ही ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी एक मोठी अडचण ठरते. या पार्श्वभूमीवर कोकण विभागातील म्हादे परिवार संलग्न कोकणस्थ म्हादे प्रतिष्ठान, मुंबई यांनी समाजाभिमुखतेचा आदर्श ठेवत राजापूर तालुक्यातील भू पेंडखळे प्राथमिक शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. या उपक्रमात विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, क्रेयॉन्स, परीक्षा पॅड यांसारख्या अत्यावश्यक साहित्यांचे वितरण करण्यात आले. शैक्षणिक साहित्य पाहून मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणित झाला होता. प्रतिष्ठानचे संस्थापक संदीप म्हादे- साखरपा, अध्यक्ष प्रदीप म्हादे- शेंबवणे, सरचिटणीस दीपक म्हादये- भू पेंडखळे, खजिनदार संजय म्हादये, उपाध्यक्ष रविंद म्हादे- तळसर, कार्याध्यक्ष सत्यवान म्हादये- मेर्वी, सदस्य रविंद्र म्हादे- बोरगांव, संदीप म्हादये - वडद हसोळ, सल्लागार विलास म्हादये, संतोष म्हादये, अनंत म्हादये- भू पेंडखळे तसेच स्थानिक ग्रामस्थ व शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावागावात अजूनही अशा विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे, ज्यांच्याकडे शिक्षणासाठी मूलभूत साधनेसुद्धा नाहीत. ही गरज ओळखून आम्ही हा उपक्रम हाती घेतला असे मत संदीप म्हादे यांनी यावेळी मांडले. मानवी संवेदनांची प्रेरणा घेऊन उपक्रम हाती घेतला आहे. यंदाचे पाचवे वर्ष असून ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य पाहून समाधान वाटते असेही ते म्हणाले. आजच्या काळात जेव्हा डिजिटल शिक्षण झपाट्याने पुढे जात आहे, तेव्हा अनेक ग्रामीण भागांमध्ये अजूनही मूलभूत शैक्षणिक साहित्याची टंचाई जाणवते. अशावेळी अशा उपक्रमांमुळे केवळ शालेय गरजाच पूर्ण होत नाहीत, तर विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची उमेदही वाढते. त्यामुळे हा उपक्रम हा केवळ साहित्य वितरण नव्हे, तर एका उज्वल भविष्याची पायाभरणी असे सरचिटणीस दीपक म्हादये यांनी सांगितले.

# राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे विश्वास काटकर यांचा सत्कार!

दैनिक युवक आधार
छत्रपती संभाजीनगरः

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे राज्य सरचिटणीस तथा निमंत्रक राज्य सरकारी कर्मचारी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समिती महाराष्ट्र मा.श्री.विश्वास काटकर साहेब यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या बैठकीत महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनचे राज्य प्रवक्ता तथा हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. शेख अब्दुल रहीम सर यांनी मा.श्री. विश्वास काटकर साहेब यांचा सत्कार पुष्पगुच्छ न देता पुस्तक,शाल आणि पेन भेट देऊन केले. यावेळी मार्गदर्शक तथा जिल्हाध्यक्ष मा.डॉ.श्री.देविदास जरारे साहेब, श्री. सुर्वे राज्य नेते श्री. सातपुते , श्री.अनिल सूर्यवंशी तलाठी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष, जिल्हा उपाध्यक्ष श्री. मोहिते सर, शिक्षक भारती शिक्षक संघटनेचे नेते राज्य संपर्क प्रमुख श्री.संतोष ताठे सर आदींची उपस्थिती होती. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेतील घटक म्हणून महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन हे सलग्न संघटना आहे...




# ज्येष्ठ पत्रकार जे. एस. घरत (काका) यांचे निधन

## उरण तालुका मराठी पत्रकार संघाची भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार /**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**



उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष, सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रात सक्रिय असलेले श्री. जे. एस. घरत (वय 82) यांचे सातरहाटी, उरण येथील राहत्या घरी सोमवार दि. 4 ऑगस्ट 2025 रोजी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे पत्रकार, साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

श्री. घरत हे पनवेल-उरण आगरी समाज मंडळाचे सहसचिव, अखिल आगरी समाज परिषदेचे आजीव सदस्य, "आगरी दर्पण" मासिकाचे उपसंपादक आणि हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील ग्रंथालय व वाचनालय, पनवेल संस्थेचे कार्यकारिणी सदस्य म्हणून कार्यरत होते. पत्रकारितेबरोबरच समाजसेवेतील त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले आहे.

शासकीय सेवेत त्यांनी ऊरण पंचायत समितीत पंचायत विस्तार अधिकारी या पदावरून अनेक वर्षे प्रामाणिक सेवा केली होती. ग्रामविकास व समाजहिताचा विचार करत त्यांनी प्रत्येक भूमिकेत स्वतःला प्रामाणिकपणे सिद्ध केले.

उरण तालुका मराठी पत्रकार संघात माजी अध्यक्ष म्हणून त्यांनी संघटनेला एक आदर्श, संयमी आणि शिस्तबद्ध नेतृत्व दिले. त्यांच्या जाण्याने पत्रकार संघटनेसह संपूर्ण समाज एक अनुभवी मार्गदर्शक गमावला आहे. उरण तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने, आम्ही त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली करतो आणि त्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करण्यात आली. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष घनःश्याम कडू, उपाध्यक्ष विरेश मोडखरकर, दिलीप कडू, सहसचिव अजित पाटील, सल्लागार संजय गायकवाड, सचिव रा. ऊ. म्हात्रे, सदस्य सुयोग गायकवाड, महेश गायकवाड आदी उपस्थित होते

त्यांचे दशक्रिया विधी बुधवार दि. 13 ऑगस्ट रोजी श्री क्षेत्र माणकेश्वर येथे सकाळी 8 वाजता होणार आहे. तर दिवसकार्य गुरुवार दि. 14 ऑगस्ट रोजी सातरहाटी येथे होणार आहे. या प्रसंगी कोणत्याही प्रकारचे दुखवटे स्वीकारले जाणार नाही असे त्यांच्या कुटुंबियांनी सांगितले.

# खेड तालुका रहिवासी मंच तर्फे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप उपक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरीः- (प्रमोद तरळ)**




खेड तालुका रहिवासी मंच मुंबई या संस्थेच्या वतीने शनिवार दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी खेड तालुक्यातील १८ जिल्हा परिषद शाळांतील एकूण ३५० विद्यार्थ्यांना केंद्रीय शाळा मुरडे,धामणी व कशेडी या ठिकाणी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.या उपक्रमाद्वारे शाळेतील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना वह्या,कंपास पेटी,दप्तर यांसह छत्री असे साहित्य वाटप करण्यात आले.तीनही ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला.या उपक्रमाला संस्थेचे अध्यक्ष श्री.मंगेश महादेव तरडे,उपाध्यक्ष श्री.विजय जाधव सचिव श्री.मंगेश चव्हाण, खजिनदार श्री.सुशांत कदम,तसेच राष्ट्रपती पदक पुरस्कार प्राप्त संस्थेचे जेष्ठ सल्लागार श्री. सुरेश जाधव,माजी अध्यक्ष श्री.नवनाथ निंबाळकर,श्री रघुनाथ निकम,श्री.संतोष कदम, सल्लागार श्री.मनोहर पवार, श्री तुकाराम निकम,श्री चंद्रकांत आंब्रे, श्री. सुरेश सालेकर,श्री सुनील सुर्वे, श्री.रवींद्र महाडिक, श्री.काशिनाथ निकम,तसेच सदस्य श्री.दत्ताराम कदम,श्री. हेमंत सावंत, श्री.विरेन्द्र निकम, श्री. समीर पवार श्री संतोष निकम श्री.लोकेश गोरिले,श्री नितीन चव्हाण सौ.प्राची तरडे,सौ सुनीता सुर्वे.सौ.साक्षी निंबाळकर,सौ. वैशाली निकम,आणि खेड तालुका मंच दिवा अध्यक्ष श्री सतीश निकम हे उपस्थित होते.तसेच या कार्यक्रमास शालेय शिक्षण क्षेत्रातील शिक्षक मुख्याध्यापक आणि शालेय व्यवस्थापन समिती सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.संस्थेच्या एकूणच सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गेले महिनाभर अथक परिश्रम केले.सदर कार्यक्रमासाठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री.कृष्णकांत जंगम उर्फ जंगम गुरुजी (मामा) यांनी स्वतः जातीने सर्व ठिकाणी हजर राहून संस्थेस मोलाचे सहकार्य केले. आणि कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्तम समन्वयक म्हणून मोलाची भूमिका पार पाडली.



दैनिक युवक आधार - रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळ माथेरानच्या विविध समस्यांच्या सोडवणुकीबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या मागणीनुसार महाराष्ट्र राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री अड. आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, संबंधित विभागाचे अधिकारी, माथेरानचे माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, माथेरान भाजप शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ, उपाध्यक्ष किरण चौधरी, राजेश चौधरी, माजी नगरसेवक संदिप कदम, सुनिल शिंदे, शकील पटेल, रुपेश गायकवाड, मिलिंद कदम आदी पदाधिकारी उपस्थित होते.माथेरानच्या विकासासाठी रोप वे, फ्युनिक्यूलर रेल्वे, पायवाट व्यवस्थापन, वस्तू वाहतूक, पर्यटक सुविधा, कायदेशीर मदत इत्यादी बाबींवर राज्य शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी या बैठकीत करण्यात आली. त्या अनुषंगाने हि बैठक सकारात्मक झाली.



दैनिक युवक आधार - अलिबाग तालुक्यातील बहिरेश्वर मत्स्य व्यवसाय विकास मच्छिमार सहकारी संस्था धेरंड मर्यादित मच्छिमार संघटनेच्या विविध मागण्यांसंदर्भात राज्याचे मत्स्योद्योग व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक पार पडली. या बैठकीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आस्वाद पाटील यांच्यासह मच्छिमार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# हर घर तिरंगा उपक्रमअंतर्गत थेपडे विद्यालयात राखी बनविणे कार्यशाळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील**

जळगाव तालुक्यातील म्हसावद येथे दि. 5/8/2025 रोजी शासनाच्या परिपत्रकानुसार "हर घर तिरंगा" या उपक्रमांतर्गत राखी बनविणे कार्यशाळा स्वा सै पं ध थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय म्हसावद ता.जि. जळगाव या विद्यालयात घेण्यात आली .या स्पर्धेत विद्यालयातील एकूण 102 विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. यात तिरंग्याचा रंगांचा वापर करून तसेच टाकाऊ वस्तु पासून सुंदर व आकर्षक, मनमोहक अशा "तिरंगा" राख्या तयार केल्या. तयार केलेल्या राख्या देशाचे संरक्षण करणाऱ्या सैनिकांना पाठवणार



आहेत. सैनिकांविषयी असलेला आदर, देशाप्रती कर्तव्यभावना तसेच देशाचे व सैनिकांचे महत्त्व याबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री पी डी चौधरी सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.सदर प्रसंगी उपमुख्याध्यापक श्री जी डी बच्छाव,सर पर्यवेक्षक श्री के पी पाटील सर तसेच या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती व्ही. एम. सूर्यवंशी मॅडम श्रीमती योगिता पाटील मॅडम व कलाशिक्षक श्री डी एम सोनवणे सर यांनी विशेष परिश्रम घेतले. इतर सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी सहकार्य केले

# लाईन असून गावकरी अंधारात; अभियंत्याच दुर्लक्ष वडकी महावितरणच्या हलगर्जी पणामुळे

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे**

**राळेगांव** :-तालुक्यातील विहिरगांव येते गेल्या आठ दिवसा पासून लाईन असून गावकरी अंधारात आहे गावातील डिपी चा ट्रान्सफार्म जाऊन असून वडकी महावितरण ला वारंवार माहिती देऊन सुद्धा अधिकारी लक्ष देत नसल्यामुळे गावकऱ्याला मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे याला जबादार कोण तरी पण वरिष्ठ अधिकारी यांच दुर्लक्ष होत असल्याच दिसत आहे,वारंवार लाईन खंडित होत असल्यामुळे विहिरगाव येथील नागरिक त्रस्त झाले आहेत, विद्युत सतत खंडित होत असल्या मुळे गावातील नागरिकांनी महावितरण कार्यालय वडकी यांच्यावर संताप व्यक्त केला आहे विद्युत उपकरणे लहान मुलांना होणारा त्रास तसेच आजारी वय वृद्ध व्यक्तींना होणारा त्रास गावातील शेतकऱ्याच्या ऑनलाईन कामामध्ये अडथळा येत असून कर्मचाऱ्याचे दुर्लक्ष होत असून गावातील विद्युत प्रवाहच्या पेठ्या अस्ताव्यस्त झाल्या आहे,त्याकडे सुद्धा दुर्लक्ष आहे गावातील एखादी फेज गेला असता गावातील नागरिकांना स्वतः जाऊन फेज टाकावा लागतो आपल्या जीवावर बेतून हे सर्व काम करावे लागत आहे या मध्ये काही जीवितहानी झाल्यास याला जबाबदार कोण या सर्व बाबीचा आढावा घेऊन त्वरित यावर कार्यवाही करावी असे विहिरगांव येथील नागरिककातून बोलले जात आहे.

गावातील खंब्या वरून डायरेक्ट लाईन टॉवर ला गावामध्ये एअरटेल टावर होऊन एक वर्ष उलटून गेले असून सुद्धा टावरला अजून डिपी कनेक्शन बसवलेलं नाही फक्त डिपी उभी करून शोभेची वस्तू दिसून राहली आहे डायरेक्ट गावातल्या खंबावरून टावरला लाईन पोहचवली जात आहे एवढं महाभारत चालू असून सुद्धा वरिष्ट अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे फक्त आणी फक्त वसुली करून पैशे जमा करण्याच्या तालात कर्मचारी दिसून येत आहे या सर्व कामाला अभय कुणाचे वरिष्ठ अभियंता की कर्मचारी यांचे सहकार्य असल्याच दिसून येत आहे.

**पत्रकार व सामाजिक कार्यकर्ता**
**रजत चांदेकर.विहिरगाव**

## परतूरच्या शास्त्री विद्यालयात चित्रकला परीक्षा केंद्रास मिळाली मंजुरी ...

**दैनिक युवक आधार**
**परतूर - जालना (अशोक ठोके)**

परतूर येथील शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयात शालेय शिक्षण विभागाच्या वतीने शासकीय रेखाकला एलिमेंटरी व इंटरमिजीएट चित्रकला परीक्षा केंद्रास मंजुरी




देण्यात आली आहे.या निर्णयाचे विद्यार्थी व पालक वर्गातून स्वागत करण्यात येत आहे.शहरात पुर्वी चित्रकला परीक्षेचे केवळ एकच परीक्षा केंद्र होते. त्यामुळे विद्यार्थ्यांची मोठी अडचण व्हायची. परंतु आता लालबहादूर शास्त्री विद्यालयात देखील परीक्षा केंद्राला मंजुरी मिळाली आहे.त्यामुळे शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. अनेक विद्यार्थ्यांना चित्रकलेची आवड आहे. शाळेत चित्रकला परीक्षेचे केंद्र असावे अशी आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांची तसेच पालकांची मागणी होती. ही मागणी आता पूर्ण झाली असून शाळेत चित्रकला परीक्षा केंद्राला मंजुरी मिळाली असल्यामुळे मुख्याध्यापक एल. के. बिरादार व चित्रकलेचे शिक्षक सिद्धार्थ मोरे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# महेंद्रशेठ घरत यांच्या परदेशवारी पंचवीशीत जयंत पाटील आणि रामशेठ ठाकूर भावूक

दैनिक युवक आधार महाराष्ट्र प्रतिनिधी

राजकारणात एकमेकांचे प्रतिस्पर्धी समजले जाणारे शेतकरी कामगार पक्षाचे नेते जयंत पाटील आणि भाजपचे ज्येष्ठ नेते लोकनेते रामशेठ ठाकूर हे एकाच मंचावर भावूक होऊन जुन्या आठवणींमध्ये रमले आणि उपस्थितांना गोंधळात टाकून गेले हे राजकीय वैरी आहेत की जिवाभावाचे मित्र?

हे निमित्त होते जागतिक कीर्तीचे कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या परदेश प्रवासाच्या रौप्यमहोत्सवाचे. 1999 पासून सुरू झालेल्या या प्रवासाने तब्बल 60 देशांचा टप्पा पार केला आहे, आणि याच गौरवासाठी उरणमध्ये एक भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात "प्रवासाची पंचवीशी" या घरत यांच्या पुस्तकाचे प्रकाशन रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते पार पडले. या वेळी जयंत पाटील यांनी आपल्या भाषणात परदेशवारीच्या सुरुवातीच्या आठवणींना उजाळा दिला, तर रामशेठ ठाकूर यांनी महेंद्र घरत यांना "स्वतःच्या हिमतीने जागतिक पातळीवर नाव कमावलेला नेता" म्हणून गौरवले.

पण खऱ्या चर्चेचा विषय ठरला दोघांचे एकमेकांवरील उद्गार. जयंत पाटील यांनी आपले 'पूर्वीचे नेते' म्हणून ठाकूर यांचा सतत उल्लेख केला, तर ठाकूर यांनी गौप्यस्फोट केला की, "महेंद्र घरत हे काँग्रेसमध्येच राहावेत म्हणून आपण सल्ला दिला होता यावेळी उपस्थित प्रेक्षकांमध्ये कुजबुज सुरू होती. राजकीय कुरघोड्यांत कट्टर प्रतिस्पर्धी मानले जाणारे हे नेते प्रत्यक्षात इतके जवळचे? कार्यक्रमाला संदीप चव्हाण (संपादक, बित्तंबातमी), आमदार बाळाराम पाटील, जे. एम. म्हात्रे, कॉ. भूषण पाटील, अरुणशेठ भगत, वाय. टी. देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

महेंद्र घरत यांनी आपल्या प्रस्ताविकेत स्पष्ट केले की, "आपल्या सहकाऱ्यांना आणि कुटुंबियांना परदेशवारीचा अनुभव द्यावा



यासाठी स्वतःच्या खर्चातून वारंवार प्रवास घडवून आणले." त्यांनी आपल्या उत्पन्नाचा काही हिस्सा समाजासाठी, शिक्षणासाठी आणि गरजूंसाठी वापरण्याची समर्पित भूमिका देखील मांडली. कार्यक्रमात घरत यांच्या परदेशवारीवर आधारित चित्रफीत दाखवण्यात आली. तसेच या प्रवासात साथ देणाऱ्या दिवंगत सहकाऱ्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली कार्यक्रमाला एक सुस्पष्ट सामाजिक, भावनिक आणि राजकीय किनार लाभली आणि सोबतच अनेक अनुत्तरित प्रश्नही मागे राहिले.

# पोलिस प्रशासन यांनी घेतले वंचितचे राजू कांबळे व कार्यकर्ते यांना ताब्यात..!

दैनिक युवक आधार
हदगाव प्रतिनिधी विश्वदीप कांबळे

आ. हेमंत पाटील याना काळे झेंडे दाखवण्याच्या अगोदरच पोलिस प्रशासन यांनी वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष राजू कांबळे व इतर कार्यकर्त्यांना घेतले ताब्यात !

आमदार हेमंत पाटील यांनी विधान परिषदेमध्ये परभणी सोमनाथ सूर्यवंशी प्रकरण, बोंढार तालुक्यातील अक्षय भालेराव प्रकरण व तसेच अट्रॉसिटी कायद्याबाबत बेताल वक्तव्य केले होते, याप्रकरणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने हिंगोली जिल्ह्यात हेमंत पाटील आल्यास त्यांचा निषेध करू असा इशारा दिला होता.या अनुषंगाने कावड यात्रेनिमित्त आमदार हेमंत पाटील हे कळमनुरी ते हिंगोली या मार्गाने जाणार होते,वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून काळे झेंडे दाखवून हेमंत पाटील यांचा निषेध करण्यात येणार होता, त्याच प्रकरणी पोलीस प्रशासनाने वेळेतच वंचित बहुजन आघाडीचे नियोजनकरते तालुका अध्यक्ष राजू कांबळे,दिनेश



पाईकराव,नचिकेत वाढवे यांना ताब्यात घेतले, परंतु आज रोजी जरी पोलिस प्रशासन यांनी थांबवले असेल पण येणाऱ्या काळात केव्हाही हेमंत पाटील यांचा दौरा असेल तेव्हा वंचित बहुजन आघाडी स्टाइल ने उत्तर देऊ,असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष राजू कांबळे यांनी दिला.

# खालिद का शिवाजी"या चित्रपटावर तातडीने बंदी घालण्याची मागणी – शिवसेवकांचा

## तहसीलदार कार्यालयावर निवेदनाद्वारे निषेध

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पवित्र चरित्राचे विकृतीकरण करणाऱ्या आणि समाजात धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या "खालिद का शिवाजी" या चित्रपटावर तातडीने बंदी घालण्यात यावी, अशी जोरदार मागणी शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थान च्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मारुती सुरवसे यांच्या नेतृत्वाखालील निफाड तहसीलदार कार्यालयातील विशाल नाईकवाडे सर यांना निवेदन सादर केले. या निवेदनात नमूद केल्यानुसार, "खालिद का शिवाजी" या चित्रपटात अनेक तथ्यहीन दावे करून इतिहासाचा विपर्यास केला जात आहे. त्यातील मुख्य भ्रामक दावे म्हणजे : 1. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यात ३५% मुस्लिम सैनिक होते – हा दावा पूर्णपणे अप्रामाणिक आहे. कोणत्याही अधिकृत शिवकालीन ऐतिहासिक दस्तऐवजात अशा टक्केवारीचा उल्लेख नाही. 2. छत्रपती शिवाजी महाराज यांचे ११ अंगरक्षक मुस्लिम होते – हा देखील दावा आधारहीन असून, महाराजांचे अंगरक्षक हे निष्ठावान, स्वराज्यासाठी प्राण अर्पण करणारे आणि हिंदू धर्मातील होते. येथे धर्म नसून 'कर्तृत्व व निष्ठा' हाच मुख्य निकष होता. 3. रायगडावर मस्जिद असल्याचा दावा – रायगडावर कोणतीही मस्जिद नसून, यासंदर्भात कोणत्याही ऐतिहासिक दस्तावेजात किंवा पुरातत्त्व खात्याच्या नोंदीत असा उल्लेख नाही. अभिजीत महाले यांनी अधिकाऱ्यांना बोलताना म्हणाले "'खालिद का शिवाजी' या चित्रपटामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाचे जाणीवपूर्वक विकृतीकरण केले गेले आहे. ३५% मुस्लिम सैनिक, ११ मुस्लिम अंगरक्षक, आणि रायगडावर मस्जिद असल्याचे दावे हे पूर्णपणे तथ्यहीन, भ्रामक आणि ऐतिहासिक पुराव्यांशिवाय समाजात तेढ निर्माण करणारे आहेत. शिवकालीन बखरी, पत्रव्यवहार, आणि ब्रिटिश-डच प्रवासवृत्तांतांमध्ये यासंदर्भात कोणतेही उल्लेख नाहीत हे सर्व दावे महाराजांच्या चरित्राची बदनामी करणारे असून, आम्ही याचा तीव्र निषेध करतो. अशा चित्रपटांवर तात्काळ बंदी आणून, इतिहासाच्या पवित्रतेचे रक्षण करणे ही शासनाची जबाबदारी आहे.

या पार्श्वभूमीवर संघटनेने खालील मागण्या केल्या आहेत :

1. "खालिद का शिवाजी" या चित्रपटावर तात्काळ बंदी घालण्यात यावी.
2. चित्रपटातील सर्व आशय व संवादांची सेंसर बोर्डमार्फत नव्याने तपासणी करण्यात यावी.
3. इतिहासाच्या विकृतीकरणासाठी जबाबदार असलेल्या लेखक, दिग्दर्शक व निर्मात्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.
4. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये या चित्रपटाचे प्रदर्शन रोखण्यात यावे.
5. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्राची विटंबना टाळण्यासाठी विशेष कायदा किंवा मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात यावी.

या निवेदना वेळी संस्थेचे पदाधिकारी नाशिक विभाग प्रमुख अभिजीत महाले , केदार शिंदे , भूषण जाधव, अभिमन्यू घोडके आदी मान्यवर उपस्थित होते...

# मराठी चित्रपटसृष्टी महाराष्ट्राचे वैभव : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार प्रदान सोहळा

**दैनिक युवक आधार**
**विकास वायाळ मुंबई, वार्ताहर**

मराठी चित्रपटसृष्टी, रंगभूमी आणि कलावंत हे महाराष्ट्राचे वैभव असून दादासाहेब फाळके यांच्या "राजा हरिश्चंद्र" चित्रपटाच्या रुपाने रुजलेलं हे बीज आज वटवृक्ष बनलं आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. सांस्कृतिक कार्य विभागाच्या महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार २०२५ व चित्रपती कै. व्ही. शांताराम तसेच स्व. राज कपूर जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कार छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्कार २०२५ तसेच ६० आणि ६१ वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार प्रदान सोहळा वरळी येथे एसव्हीपी स्टेडियम, डोम येथे झाला, त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मराठी रंगभूमी ही जगातील सर्वोत्कृष्ट रंगभूमी आहे. छोटा पडदा, मोठा पडदा, ओटीटी प्लॅटफॉर्म अशा विविध माध्यमांत मराठी कलावंतांनी अप्रतिम योगदान दिले आहे. केवळ कलावंतच नाही तर पडद्यामागे काम करणाऱ्या सर्वांचा मनापासून गौरव व्हावा, हीच महाराष्ट्र शासनाची भूमिका आहे. राज्य सरकार तुमच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे श्री.फडणवीस यांनी यावेळी सांगितले. अनुपम खेर यांच्या बहुप्रतिभावान अभिनयाचा गौरव करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "पहिल्याच चित्रपटात 70 वर्षांच्या वृद्धाची भूमिका साकारणारे खेर आजही तितक्याच उत्साहाने अभिनय करत आहेत." मुक्ता बर्वे यांच्या 360 अंश अभिनय क्षमतेचा, विशेषतः 'चार चौघी' मधील त्यांच्या मोनोलॉगचा, तसेच महेश मांजरेकर यांच्या दमदार अभिनय आणि दिग्दर्शनाचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी गौरव केला. गझलकार भीमराव पांचाळे यांचा उल्लेख करताना श्री फडणवीस म्हणाले, "सुरेश भट आणि भीमराव पांचाळे यांची जोडी मराठी गझलांना अविस्मरणीय उंचीवर घेऊन गेली." "शिवाजी महाराजांच्या नावाने जागतिक वारसा मिळविणे हे महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक आणि अभिमानाचे क्षण आहे," असं ते म्हणाले. "मराठी चित्रपटसृष्टी आमचं वैभव आहे आणि ती भविष्यात अधिक समृद्ध होईल, असा मला विश्वास आहे," अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. मुंबईत कुठेही चित्रीकरणासाठी नि:शुल्क परवानगी:- सांस्कृतिक कार्य मंत्री अड. आशिष शेलार मुंबईतील कोणत्याही ठिकाणावर



चित्रीकरणासाठी आता नि:शुल्क परवानगी दिली जाणार आहे. तसेच राज्यातील विविध चित्रपट निर्मिती स्थळांवर सुलभ दरात सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे,असे सांस्कृतिक कार्य मंत्री अड.आशिष शेलार यांनी सांगितले. मराठी चित्रपटांचा जागतिक पातळीवर प्रचार आणि प्रसार करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचा मराठी चित्रपट महोत्सव पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी (रवींद्र नाट्य मंदिर) येथे आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. 'एफएम' रेडिओवर मराठी गाणे व कार्यक्रमांसाठी ठराविक वेळ देण्याबाबत एफएम रेडिओ चॅनेल्सशी चर्चा केली असून त्यासाठी पुरस्कार योजना देखील जाहीर केली असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. अमेरिका दौऱ्यात नेटफ्लिक्सच्या लॉस एंजेलिस येथील मुख्यालयात मराठी चित्रपटांना स्थान देण्याची मागणी केल्याचेही श्री शेलार यांनी सांगितले. "मराठी सिनेमा, चित्रपटगृहे आणि निर्मात्यांना हक्काचे स्थान मिळावे, यासाठी आम्ही टप्प्याटप्प्याने काम करत आहे" असेही त्यांनी सांगितले. या पुरस्कार वितरण कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते गजलगायक भीमराव पांचाळे यांना "गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार 2025" प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर पद्मश्री काजोल देवगण यांना स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार 2024, पद्मभूषण अनुपम खेर यांना स्व.राज कपूर जीवनगौरव पुरस्कार 2024, अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना चित्रपती कै. व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार 2024 आणि निर्माते महेश मांजरेकर यांना चित्रपती कै. व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार 2024 पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावर्षीपासून प्रथमच सुरू करण्यात आलेला "छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्कार 2025" हा युनेस्कोतील भारताचे कायस्वरूपी प्रतिनिधी राजदूत विशाल शर्मा यांना मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचे जतन व संवर्धन करणाऱ्या अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाचे अध्यक्ष उमेश झिरपे, कार्यकारी अध्यक्ष ऋषिकेश यादव, दुर्ग अभ्यासक माधव फडके यांना सन्मानित करण्यात आले. ।वेळी 60 आणि 61 व्या हीरक महोत्सवी महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, राज्यमंत्री अड. आशिष जयस्वाल, अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, फिल्मसिटीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे - पाटील, सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभागाचे संचालक डॉ.तेजस गर्गे, चित्रपट क्षेत्रातील दिग्गज कलाकार, कलारसिक, प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी हीरक महोत्सव स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

# समर्पणाचे व्रत – पत्रकारिता आणि ग्राहक संरक्षणाच्या माध्यमातून

दैनिक युवक आधार
उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील

वाशिमः-माणूस या सृष्टीवर जन्माला येतो, तेव्हा केवळ आयुष्य जगण्यासाठीच नव्हे, तर काही तरी कार्य करण्यासाठीच त्याची नियती ठरवलेली असते, असे वाटते. परमेश्वराने प्रत्येकाच्या आयुष्यात एक ठराविक उद्दिष्ट ठेवलेले असते आणि त्या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी तो आपल्याकडून काही ना काही कार्य करून घेत असतो. माझ्या बाबतीतही असेच घडले की काय, असा विचार मनात अनेकदा येतो. माझ्या वाट्याला आलेले कार्य हे पत्रकारिता आणि ग्राहक संरक्षण या दोन महत्वपूर्ण क्षेत्रांतले आहे. या दोन्ही माध्यमांतून मला समाजासाठी काही करण्याची, जनतेच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधण्याची एक सुवर्णसंधी लाभली आहे. आज मी वाशिम जिल्ह्यात पत्रकारिता आणि ग्राहक संरक्षण संघटनेच्या माध्यमातून सक्रियपणे कार्यरत आहे. एक निर्भीड पत्रकार म्हणून समाजात घडणाऱ्या घटनांना, सामान्य जनतेच्या व्यथा-वेदनांना माझ्या लेखणीतून माध्यमांपर्यंत पोहोचवण्याचे प्रामाणिक कार्य मी करत आहे. तसेच, ग्राहक संरक्षण संघटनेच्या माध्यमातून जनतेच्या अनेक तक्रारी, अडचणी, अन्याय यांचे गांभीर्याने निराकरण करण्याचा सातत्याने प्रयत्न करत असतो. या कार्यप्रवाहात, अनेक वेळा नागरिक आपापल्या समस्या घेऊन माझ्याकडे येतात. त्यांच्या समस्या प्रशासन, शासनाकडे मांडून त्या सोडवण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील असतो. जोपर्यंत त्या नागरिकाला समाधानकारक उत्तर मिळत नाही, तोपर्यंत मी थांबत नाही. माझ्या या प्रयत्नांमुळे अनेक ग्राहकांच्या समस्या आजपर्यंत सोडवल्या गेल्या आहेत, ही माझ्यासाठी अत्यंत समाधानाची बाब आहे. संघटनेने मला वाशिम जिल्ह्यासाठी काम करण्याची संधी दिली आणि त्या विश्वासाला मी पूर्णपणे न्याय देण्याचा प्रयत्न करत आहे. संघटनेच्या कामादरम्यान मी अनेक दुःखी चेहरे जवळून पाहिले आहेत, अनेकांच्या व्यथा ऐकल्या आहेत. या प्रवासात शासन व प्रशासनाच्या अडचणीही समजल्या. काही वेळा काही तक्रारी केवळ सवयीने करण्यात येतात,



परंतु ज्या ग्राहकावर खऱ्या अर्थाने अन्याय झालेला असतो, त्याच्या हक्कासाठी मी सतत लढा देतो. याशिवाय, वाशिम जिल्ह्यातील सामाजिक, आर्थिक व राजकीय घडामोडींवर एक जागरूक पत्रकार म्हणून मी सतत लक्ष ठेवतो. त्यामुळे संघटनेच्या कार्यासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक गोष्टींचा उपयोग मला होतो. या कार्याची सर्वांत मोठी जमेची बाजू म्हणजे – ही संघटना पूर्णपणे निःस्वार्थ आहे. इथे कुठलाही आर्थिक व्यवहार नाही, कुठेही पैशांचा संबंध नाही. केवळ सेवाभाव, निःस्पृहता आणि जनतेसाठी कार्य करण्याची नितांत इच्छा असणारे कार्यकर्ते इथे एकत्र आलेले आहेत. ही संघटना माझ्यावर विश्वास ठेवून वारंवार मला पुरस्कार देऊन गौरवित करत आहे, हे माझे भाग्य समजतो. भविष्यातही मला अधिकाधिक जनतेची सेवा करता यावी, हीच ईश्वरचरणी प्रार्थना आहे. अनेक संघटना निर्माण होतात आणि काळाच्या ओघात लयाला जातात. मात्र, ही संघटना – ग्राहक संरक्षण संघटना – जनसेवेच्या उदात्त हेतूने कार्यरत आहे आणि मी तिचा एक भाग आहे, हेच माझे खरे गौरव आहे. संघटनेच्या पुढील वाटचालीसाठी मी मनःपूर्वक शुभेच्छा देतो. तसेच, माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल संघटनेप्रती मी मनःपूर्वक आभार मानतो.

# आमदार प्रशांत ठाकूर यांचे नेतृत्व सर्वांचा अभिमान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** आमदार प्रशांत ठाकूर हे कोकणाचे नेतृत्व करणारे नेते असून, त्यांच्या सारखे नेतृत्व आपल्याला सर्वांना लाभले आहे याचा आपल्या सर्वांना अभिमान आहे, असे प्रतिपादन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी वस्त्रवारसा हातमाग साडी प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी केले. भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा पनवेल शहर मंडळाच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आणि हातमाग दिवसाचे औचित्य साधून महिलांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पैठणी महोत्सव, फॅशन शो, आणि हातमागाच्या साड्यांचे प्रदर्शन कार्यक्रम बुधवारी झाले. दरम्यान या कार्यक्रमांतर्गत वस्त्रहरण हातमाग साडी प्रदर्शनाचे उदघाटन सौ.वर्षा प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आणि भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. हा कार्यक्रम अनेक संस्थांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला आहे, ज्यात साईनगर चॅनेल उपवन, अभिनव महिला मंडळ, नाच ग घुमा, गार्गीज ग्रुप, जागृती महिला मंडळ, रमाई महिला मंडळ, पनवेल स्मार्ट मॉमीज, स्वयंसहाय्यता महिला मंडळ, जीएस फाउंडेशन, जय भवानी महिला मंडळ, एकविरा महिला मंडळ, लहूजी महिला मंडळ, ज्येष्ठ नागरिक संघ, आणि श्री समर्थ महिला मंडळ यांचा समावेश आहे. या प्रदर्शनाच्या उद्घटनावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंजारराव, सरचिटणीस अमित ओझे, महिला मोर्चा पनवेल शहर मंडळ अध्यक्षा रुचिता लोंढे, माजी नगरसेवक अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, माजी नगसेविका अनुराधा ठोकळ, प्रीती जॉर्ज, डॉक्टर सुरेखा मोहकर, सारिका भगत, सुलोचना कल्याणकर, नीता माळी, सुहासिनी शिवणेकर, वर्षा नाईक, प्रीतम म्हात्रे, रुपेश नागवेकर, प्रशांत शेटे, प्रवीण मोरबाळे, संजीवनी खिलारे, स्नेहल खरे, नीता मंजुळे, मनीषा बहिरा, शिवानी घरत, सपना पाटील, कविता ठाकूर यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# माहिती अधिकार कार्यकर्ते रमेश हिंदुराव सर यांना मिळाली 50000रुपये नुकसान भरपाई

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी.गौरव खरे.मुरबाड.**

केंद्र शासनाच्या २००५ माहिती अधिकार कायद्याअंतर्गत लोक मित्र श्री रमेश हिंदुराव यांनी 28 . 7.2021 रोजी मुरबाड तालुका शेतकरी संघ लि यांचे कडे त्या सालातील भात खरेदी संदर्भातील माहिती मागितली होती . सदर माहितीची ३०० पाने आसताना तेथील शासकीय माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून 1,13,768 रुपये ठाणे जिल्हा बँकेतील त्यांच्या खात्यावर 29.7.2021 रोजी भरून घेतले . मात्र त्यांनी तरीही माहिती दिली नसल्यामुळे. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था मुरबाड यांचे कडे प्रथम अपील दाखल केले असता त्यांनी सुनवणी घेऊन माहिती देण्याचे निर्देश दिले.मात्र तरीही माहिती न दिल्याने रमेश हिंदुराव यांनी राज्य माहिती आयोग कोकण खंडपीठ यांचे कडे 3.9.2021 रोजी द्वितीय अपील दाखल केले . त्याचा अपील क्रं 1534/2021.हा होता . त्याची सुनावणी 12.11.2024 रोजी राज्य माहिती आयोग यांचेकडे घेण्यात आली . त्यात अपील करत्याचे म्हणने एकुन घेतल्या नंतर शासकीय माहीती अधिकारी यांना श्री रमेश हिंदुराव यांनी भरलेली रक्कम परत करून माहिती विनामुल्य देण्याबाबत आपली बाजु मांडण्याबाबत सांगितले.त्याची पुन्हा 6.2.2025 रोजी सुनवाणी घेतली . शासकीय माहिती अधिकारी यांचा खुलासा समर्पक नसल्याने रमेश हिंदुराव यांना भरलेली रक्कम तात्काळ परत करून माहिती विनामुल्य द्यावी आणि माहिती अधिकार कार्यकर्त्यांना झालेल्या आर्थिक व मानसिक त्रासामुळे 50000 हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचे 20मार्च 2025 रोजी मुरबाड तालुका शेतकरी संघ लि यांना आदेश दिले.त्यानुसार मुरबाड तालुका शेतकरी संघ.लि यांनी 50000 हजार रुपयांचा चेक रमेश हिंदुराव सर यांना दिला असून सदर चेक त्यांच्या खात्यावर जमा झाला आहे . प्राप्त माहिती नुसार हि ऐतिहासिक घटना असुन आयोगाने याची गंभीर दखल घेतल्याबाबत माहिती अधिकार कार्यकर्ते श्री रमेश हिंदुराव यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे . योग्य मार्गाने लढा दिला तर न्याय मिळतोच असे लोकमित्र रमेश हिंदुराव यांनी सांगितले.



# पनवेलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळनिहाय राबवला

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

४ ऑगस्ट रोजी तहसिलदार पनवेल कार्यालयातील सर्व मंडळामध्ये "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात आलेले आहे. कळंबोली मंडळातील, परशुराम जोमा म्हात्रे व आत्माराम म्हात्रे विद्यालय मौजे नावडे येथे उपविभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक, तहसीलदार पनवेल, विजय पाटील तसेच नायब तहसीलदार संजय भालेराव तसेच संबंधित मंडळ अधिकारी ग्राम महूसल अधिकारी व ग्रामस्थ व उरण सामाजिक संस्थाचे कार्यकर्ते व तसेच शाळेचे सर्व शिक्षक उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात महसूल सप्ताह निमित्त जातीचे दाखले, रेशनकार्ड, जिवंत 7/12, वारस नोंदी, व विविध दाखले वितरित करण्यात आले आहेत. या अभियानामध्ये खिडूकपाडा कातकरी वाडी या मधील ग्रामस्थांना १०० जातीचे दाखले वाटप करण्यात आले आहे. याप्रसंगी उरण सामाजिक संस्था मार्फत नेहमी कार्य करत असलेले ॲड राजेंद्र मढवी व इतर सहकारी यांचे प्रशस्ती पत्रक देऊन सन्मान करण्यात आले. या कार्यक्रमात खिडूकपाडा आदिवासी वाडी मधील ग्रामस्थांनी प्रशासनाचे आभार व्यक्त केले.ओवळे मंडळामध्ये मौजे कुंडेवहाळ येथे आयोजीत कार्यक्रमास राजश्री जोगी, नायब तहसिलदार (महसूल), मंडळ अधिकारी मिनाक्षी गोंधळी, इतर ग्राम महसूल अधिकारी व ग्राममस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. तळोजा मंडळातील कानपोली येथे सदर कार्यक्रम राबविण्यात आलेला असून कानपोली सरपंच मदन





मते, मंडळ अधिकारी तळोजा बापू सरगर, उपकृषी अधिकारी आर डी चौगुले, आरोग्य अधिकारी प्राजक्ता डेबोजे, तळोजा मंडळातील ग्राम महसूल अधिकारी, पुरवठा विभागाचे अधिकारी यांनी मार्गदर्शन केले .

नागरिकांना आयुष्यमान भारत अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी, जिवंत सातबारा अंतर्गत वारस प्रमाणपत्र, ॲग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळखपत्र, रेशन कार्ड, उत्पन्न दाखला, कृषी विभाग मार्फत विविध फळांच्या रोपांचे वाटप करण्यात आले याप्रसंगी गावातील नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद नोंदवला. व सर्व सेवा एकाच छताखाली मिळाल्यामुळे लोकाभिमुख प्रशासनाचे कौतुक केले.

# DG शिपिंगच्या 'त्या'आदेशामुळे भारतीय नाविकांच्या भविष्यावर मोठं संकट

## गौरव पोरवालांच्या रिट पिटीशन WP 23111/2025 नुसार न्यायालयीन दिलासा

सुमारे ५० हजार ते १ लाख नाविकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळणार ?लोकशाही मार्गाने मोर्चा व आंदोलनाची तयारी



**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर) :**

ग्लोबल सीफेअरर्स युनियन ऑफ इंडिया (GSUI) ने DG शिपिंग विरोधात १ ऑगस्ट रोजी जाहीर केलेल्या आदेशावर लाखो नाविकांनी समाधान व्यक्त केले. तर अनेक आधार रहित धोरण मान्यता पात्र संस्थानांवर लादले गेले. या आदेशानुसार, भारतात कोणतीही विदेशी समुद्री प्रशिक्षण संस्था किंवा त्यांचे प्रतिनिधी प्रशिक्षण कार्यक्रमात अनेक अडचणी उद्भवतील, असे सांगण्यात आले. ब्लॅकलिस्टिंग, प्रमाणपत्र अमान्य करण्याचे अधिकृत अधिकार नसतानाही डिजी शिपिंगचे धोरण मर्चंट शिपिंग कायद्याचे उल्लंघन करण्यासारखे असल्याने त्यावर चिंता व्यक्त करण्यात आली.

GSUIच्या मते, या आदेशामुळे 50 हजार ते 1 लाख भारतीय सीफेअरर्सच्या करिअरवर संकट येणारी परिपत्रक अन्यायकारक असून ज्या युवकांनी भारतात असलेल्या विदेशी संस्थांकडून वैध STCW प्रमाणपत्र घेतले आहे, त्यांना याचा मोठा फटका बसत आहे. GSUI सदस्य गौरव पोरवाल यांनी सांगितले, अशा जुलमी आदेशामुळे अनेक भारतीय सीफेअरर्सच्या भविष्यात अनिश्चितता निर्माण झाली आहे, यामुळे नाविक क्षेत्रातील घटकांच्या सर्वांगीण विकासामध्ये बाधा येतील, असे एकतर्फी धोरण आम्हाला अमान्य असून याप्रकरणी पुढील लढाई न्यायिक व लोकशाहीच्या माध्यमातून संघर्षवादी असेल. यातून निर्माण होणाऱ्या कायदा व सुवस्थेच्या परिणामाबाबत संपूर्णपणे DG शिपिंग जबाबदार असेल, असा इशारा देण्यात आला.

सरकारने सीफेअरर्सच्या हिताचा विचार केला नाही, तर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा गंभीर इशारा या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून देण्यात आला. या पत्रकार परिषदेत गौरव पोरवाल, ॲडव्होकेट विमल झा, मिस्टर सिन्हा, रमेश गोरे व आदी कायदेशीर तज्ञ शिष्ट मंडळ उपस्थिती होते.

*****************

# उमरी तालुका तहसीलदार तथा तालुका दंडअधिकारी पदी मंजुषा भगत रुजू

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड – लातूर जिल्ह्यातील रेनापुर तालुक्यातुन थेट उंमरी येथे बदली तहसिलदार तालुका दंडाधिकारी मंजुषा भगत तहसीलदार पदी विराजमान झाले आहेत. त्या अगोदर उमरी येथील तहसीलदार प्रशांत थोरात साहेब यांची बदली लातूर जिल्ह्यातील रेनापुर येथे झाली तेथील मंजुषा भगत उमरी येथे आले आहे उमरी तहसील कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्या समावेत बैठक घेऊन सर्वांनी मंजुषा भगत मॅडम त्यांचे स्वागत केले.व बैठक घेतले .त्यावेळी उमरी तहसील कार्यालयातील तलाठी व सर्व महसूल कर्मचारी उपस्थित होते. त्यावेळी उमरी येथील नायब तहसिलदार संजय देवराये साहेब, समावेत पंचायत समिती गटविकास अधिकारी व्ही.आर आरबडवार, मंडळ अधिकारी मंगेश वांगीकर, मंडळ अधिकारी गोळेगाव छाया बनसोडे, किरण कावळे, मंगला माने, व महसूल अधिकारी प्रभाकर खानसोळे, अनिल वाघमारे, ग्रामसेवक युनियन अध्यक्ष जय वनसागरे, बळेगाव सजाचे ग्राम महसूल अधिकारी दिलीप गंगासागरे, दिपक पांडे ,सय्यद मृत्यूजा, देशपांडे, स्वाती गाडे, ए .एन यनावार, बी जी कदम, महसूल सेवक सर्व दिलीप येमेवार ,उत्तम हनुमंते, शेख मोहिस, शेख रईस , शिपाई व सर्व कर्मचारी उपस्थित होते सर्वांनी मंजुषा भगत मॅडम यांचे स्वागत केले व उमरी येथील पदभार स्वीकारला आहे



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# विद्यार्थी आणि लोकसेवक व पदाधिकारी यांचा गुणगौरव सोहळा थाटात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

मारेगाव:-तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मार्च २०२४-२५ या शैक्षणिक सत्रात उत्तीर्ण झालेल्या तसेच विशेष कार्य करणाऱ्या लोकसेवक व पदाधिकारी यांचा जाहीर सत्कार दिनांक ३१ जुलै २०२५ गुरुवारला दुपारी १२.०० ते ५.०० या वेळेत शेतकरी सुविधा केंद्र येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गुणगौरव समिती द्वारा आयोजित गुणगौरव सोहळा २०२५ मध्ये थाटात संपन्न झाला.या सोहळ्याचे उद्घाटन अध्यक्ष वर्धमान फाउंडेशन वणी व संचालक बुलढाणा अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी विजयबाबु चोरडिया व मंचावरील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप्रज्वलन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेची पूजन व पुष्प अर्पण करण्यात आले तर या सोहळ्याचे अध्यक्षस्थान अखिल भारतीय सरपंच संघटना अध्यक्ष मारेगाव तालुका अविनाश लांबट यांनी भूषविले असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोलीस निरीक्षक उमेश बेसरकर, मुख्याधिकारी शशिकांत बाबर,शाखा व्यवस्थापक भारतीय स्टेट बँक तुषार क्षीरसागर,उपकार्यकारी अभियंता विद्युत महावितरण श्यामसुंदर कुर्रा,कृषी अधिकारी पंचायत समिती संदीप वाघमारे,वनपरिक्षेत्र अधिकारी शंकर हटकर व सहाय्यक गटविकास अधिकारी हेमराज राठोड हे लाभले असून सर्वांनी विचारमंचावरून उपस्थित श्रोत्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच सराटी तुळशीराम कुमरे,अध्यक्ष जय शिवाजी दुर्गा उत्सव मंडळ मारेगाव विशाल किन्हेकर व सदस्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भजन मंडळ घोडदळा दयाल रोगे हे लाभले असून विचार मंचावर उपस्थित उद्घाटक, अध्यक्ष,प्रमुख मार्गदर्शक व प्रमुख पाहुण्यांनी सोहळ्याला शुभेच्छा दिल्या असून या सोहळ्यात विद्यार्थ्यांचे व विशेष कार्य करणारे लोकसेवक व पदाधिकारी म्हणून सरपंच सावंगी ग्रामपंचायत अभिजीत मांडेकर,जिल्हा परिषद शिक्षिका कामिनी दोडके(दांडेकर),ग्राम विकास अधिकारी रेवीचंद जनबंधू,तलाठी संजय शिंदे,पोलीस पाटील अर्चना सयाम,वनरक्षक प्रफुल मलमकर,समाजसेवक विमल फुलझेले,पत्रकार पंकज नेहारे,रास्त भाव दुकानदार पांडूरंग कोहळे,रोजगार सेवक खुशाल येरगुडे व उद्योजक धम्मपाल दारुंडे चोखाजी गॅस एजन्सी यांना सन्मानचिन्ह देवून सन्मानीत करण्यात आले.या सोहळ्याचे सूत्रसंचालन पत्रकार दै.नमो महाराष्ट्र माणिक कांबळे यांनी तर प्रास्ताविक उपसरपंच वनोजा (देवी) व सामाजिक कार्यकर्ता प्रशांत भंडारी तसेच आभार आयोजक पत्रकार सांध्य दै.यवतमाळ मार्मिक प्रतिभा तातेड यांनी मानले असून कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता सामाजिक कार्यकर्ता आदेश तातेड यांचे योगदान लाभले असून या सोहळ्याची सर्वत्र सकारात्मक चर्चा सुरु आहे.



## कृषी उत्पन्न बाजार समितीचे अपक्ष उमेदवार रजनीकांत बोरेले संचालक यांच्या विजयाचा गौरव

दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे

पांढरकवडा : तालुक्यातील दहेली (तांडा) या गौर बंजारा समाजाच्या गावात नव्याने निवडून आलेले अपक्ष संचालक, समाजसेवक आणि व्हिसल ब्लोअर, जिंदल पुरस्कार विजेता रजनीकांत डालूरामजी बोरेले यांचा फळ आणि साड़ी वाटप समारोह दिनांक ९ ऑगस्ट २०२५ ला रक्षाबंधन च्या शुभ दिनानिमित्य संध्याकाळी ठीक ६ वाजता सेवालाल मंदिर प्रांगणात भव्य स्वरुपात होणार आहे.काही दिवसापूर्वी पार पडलेल्या कृषी उत्पन्न बाजार समिती पांढरकवडा निवडणुकीत भाजप आणि कॉंग्रेस,शिंदे,शिवसेना या सर्व पॅनेलला मागे टाकून एकमेव अपक्ष म्हणून विजयी झालेले रजनीकांत डालूरामजी बोरेले यांचा हा विजय खरोखरच ऐतिहासिक मानला जात आहे. सहकार क्षेत्रात भाजप समर्थित १८ उमेदवार अपयशी ठरले असून भाजपा चा एक उमेदवार सुद्धा निवडून आला नाही,अशा स्थितीत रजनीकांत बोरेले हे स्वबळावर अपक्ष निवडून येणे हा अशक्य ला शक्य करणे सारखी बाब आहे त्या मुळे रजनीकांत बोरेले यांचे यश एक मोठा विक्रम म्हणून शेतकरी,सामान्य लोक गावात बोरेले यांचा सत्कार करत आहे.दहेली तांडा हा गाव पूर्ण पणे बंजारा समाजातील वस्ती असून सर्व समाजातील लोकांचा व्यवसाय शेती आहे या गावात रजनीकांत बोरेले यांचा सत्कारचा फार मोठा समारोह होणार आहे, जनीकांत बोरेले यांचा दहेली तांडा येथील सरपंच नाईक यांच्या तर्फे सत्कार होणारल त्या नंतर पाच प्रकारच्या फळाने वजन काटा तुला होईल त्या नंतर महिला भगिनिंना साडी भेट देण्यात येईल त्या नंतर जेवनाचा कार्यक्रम होणार आहे असा प्रशस्त समारोह रजनीकांत बोरेले यांचा समस्त गावकारी मंडळी च्या वतीने केला जाणार आहे. विशेष बाब म्हणजे रजनीकांत बोरेले यांची धन्याची अडत व खरेदी आहे त्या मुळे दहेली (तांडा) ९० टक्के शेतकरी रजनीकांत बोरेले हे भाव चांगले देतात म्हणून त्यांच्या अडत मध्ये धान्य घेवून येतात.पूर्वी येथील शेतकरी घाटंजी,यवतमाळ,हिंगणघाट मार्केट ला धान्य विकायचे रजनीकांत बोरेलेमुळे परिसरातील शेतकरी त्यांच्या कडे धान्य घेवून येतात रजनीकांत बोरेले असा व्यक्ती विशेष आहे की कोणत्याही क्षेत्र मध्ये उतरले तर त्या क्षेत्रात स्वतःच्या नावाची छाप सोडतात म्हणून वन मैंन आर्मी म्हणून जिल्ह्यात ओळखले जातात हे विशेष रजनीकांत बोरेले यांचा काम बोलते म्हणून दहेली तांडा येथे नागरीक यांच्या वतीने फळ तुला,साडी वाटप,जेवन,या सत्कार सोहळा समारोह ला सर्व नागरिक,आवर्जून उपस्थित राहावे असे आव्हाण आयोजक धरमसिंग राठोड,सुभाष राठोड,उमेश चव्हाण,बाबुलाल चव्हाण,रामराव राठोड,अरविंद राठोड,राजू.नाईक,धनराज चव्हाण, रंगराव पवार,विक्रम राठोड,पंकज राठोड,गजू राठोड,सुभाष चव्हाण आणि समस्त गावकरी मंडळी यांनी केले असल्याचे वासुदेव राठोड सेवानगर जरंग,गणेश सिंघानिया, स्मित झाझरीया,मापारी सागर नेल्लावार,यांनी कळविले आहे.



## महाराष्ट्र शासनातर्फे एक ऑगस्ट ते सात ऑगस्ट महसूल सप्ताह राबवण्याचा संकल्प

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किसन जावळे साहेब तसेच उपविभागीय अधिकारी पवन चांडक साहेब उरण तहसीलचे तहसीलदार डॉक्टर उद्धव कदम नायब तहसीलदार नरेश पेडवी यांचे प्रमुख मार्गदर्शनाखाली आज दिनांक ०४/०८/२०२५ रोजी उरण एज्युकेशन सोसायटी हायस्कूल बोरी येथे महसूल सप्ताह अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराज राजस्व अभियान अभियान राबविण्यात आले. आज दिनांक ०४/०८/२०२५ रोजी महाराष्ट्र शासनातर्फे महसूल सप्ताह एक ऑगस्ट ते सात ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह अंतर्गत राबविण्याचा असून शासनातर्फे आज दिनांक ०४/०८/२०२५ रोजी उरण उरण एज्युकेशन सोसायटी बोरी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व महाराज राजस्व अभियान शिबिर करण्यात आले होते सदर शिबिरास तहसीलदार उरण डॉक्टर श्री उद्धव कदम नायब तहसीलदार श्री नरेश पेडवी व उरण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर मानध सचिव राजेंद्र भानुशाली सहसचिव अपूर्वा ठाकूर माजी अध्यक्ष जैन प्राचार्य सिमल दहिया नगरसेवक अतुल ठाकूर माजी नगरसेवक आर लांबे तेजाब मस्के समाजसेवक बोरी तसेच मंडळ अधिकारी मंडळ अधिकारी बी जी बासंबेकर तलाठी किरण दाभेकर समीरा गावंड कांचन वडगावकर प्रज्ञा घागरे गावातील सुमारे दीडशे ते दोनशे नागरिक उपस्थित होते सदर अभियानांतर्गत सर्व प्रकारचे शासकीय दाखले सातबारा उतारे आयुष्यमान भारत कार्ड संजय गांधी निराधार योजना इत्यादीचे वाटप व वाटप व अर्ज भरून घेण्याचे काम करण्यात आले करण्यात आले यामध्ये यामध्ये रहिवासी दाखले दोन उत्पन्न दाखला नऊ जातीचे दाखले ४० रेशन कार्ड सात वाटप करण्यात आले तसेच संजय गांधी निराधार योजनेचे पाच फॉर्म भरून घेण्यात आलेत आयुष्यमान भारत कार्ड तेरा कार्ड वाटप करण्यात आले यावेळी नागरिकांनी मोठा उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.




## रिसोड तालुका युवासेना संपर्कप्रमुख पदी गोरख पाटील बोरकर यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी वाशिम करण धोंगडे**

नंधाना येथील सामाजिक कार्यकर्ते तथा माजी उपसरपंच गोरख पाटील बोरकर यांच्या कार्याची दखल घेऊन शिवसेना नेते त्याचा आमदार भावनाताई गवळी पाटील व युवासेना जिल्हाप्रमुख प्रदिप पाटील मोरे यांनी त्यांची युवासेना रिसोड तालुका संपर्कप्रमुख पदी निवड केली. त्यांच्या निवडीमुळे रिसोड तालुक्यात युवा सेनेमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अशा पदाधिकाऱ्यांचे निवडीमुळे निश्चितच पक्षाला लाभ होणार आहे.यावेळी युवासेना उपजिल्हाप्रमुख गजाननराव अवताडे, तालुकाप्रमुख शिवसेना मच्छिंद्र ढोणे, युवासेना तालुकाप्रमुख नारायण खडसे, युवासेना शहर प्रमुख कपील पाटील कदम, उमेश गुंजकर, ज्ञानेश्वर खराटे, एकनाथ अढाव , प्रविण बोरकर यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# विंचूर येथील अंगणवाडीची दयनीय अवस्था लहान मुलांच्या जीविताला धोका, जबाबदार कोण ?



**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

विंचूर :- येथील चव्हाण वस्ती येथील अंगणवाडी सध्या अत्यंत दुर्लक्षित अवस्थेत असून, लहान मुलांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. या अंगणवाडीत स्लॅबच्या सर्व बाजूंनी पाणी गळते आहे. पावसाळ्यात छतातून गळणारे पाणी थेट मुलांच्या बसण्याच्या ठिकाणी पडते. याशिवाय, जमिनीवरील फरशा तुटलेल्या असून त्यावरून घसरून अनेक मुलांचे हातपायही जखमी झाले आहेत.

केवळ वर्गखोलीच नव्हे, तर शौचालयाचीही अवस्था अतिशय वाईट असून, पावसाळ्यात मुलांना उघड्यावर शौचासाठी जावे लागते. साधी पाण्याचे टाकीची ही नियोजन नाही स्वच्छतेचा अभाव आणि मूलभूत सुविधांची कमतरता यामुळे आजारांचीही भीती निर्माण झाली आहे. अंगणवाडीतील मदतनीस वैशाली चव्हाण यांनी या परिस्थितीबाबत ग्रामपंचायत कार्यालय, विंचूर येथे वारंवार तोंडी तसेच लेखी स्वरूपात तक्रारी दाखल केल्या आहेत. मात्र अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कारवाई किंवा दुरुस्तीचे काम झालेले नाही. या अंगणवाडीमध्ये दररोज येणाऱ्या चिमुकल्यांच्या सुरक्षेबाबत पालकांमध्ये तीव्र संताप आणि चिंता आहे. जर भविष्यात या दुर्लक्षामुळे एखादा अपघात झाला, तर त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

ग्रामपंचायतीने याची तातडीने दखल घेऊन दुरुस्तीची कार्यवाही करावी अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

दररोज अंगणवाडीत येणारी ही चिमुकली मुलं म्हणजे आमची जबाबदारी आहे. गळती, तुटलेल्या फरशा, उघडे टॉयलेट या सगळ्यात त्यांच्या जीवाला धोका निर्माण होतोय. आम्ही वेळोवेळी तक्रारी दिल्या, पण अजून काहीच झालेलं नाही. उद्या एखाद्या मुलाला काही झालं, तर जबाबदारी कुणाची? आमचा आवाज प्रशासनाने ऐकायलाच हवा..

**प्रतिक्रिया:-वैशाली चव्हाण, अंगणवाडी मदतनीस**

लवकरात लवकर जर अंगणवाडीचे शौचालय व फरशी यांचे काम झाले नाहीत तर आम्हाला आंदोलन करावे लागेल आमच्या मुलांच्या जीवितास धोका आहे यास जबाबदार कोण

**प्रतिक्रिया ग्रामस्थ :- अविनाश चव्हाण**

आमच्या चव्हाण वस्तीवरील अंगणवाडीची दुरावस्था खूपच वाईट आहे मुलांना शौचालयास पावसाळ्यात बाहेर जावे लागतात येथे सर्पही निघतात लवकरात लवकर काम जर पूर्ण झाले नाही तर आम्ही अंगणवाडीला कुलूप लावावे लागेल

**प्रतिक्रिया पालक:- सोमनाथ क्षीरसागर**

आमचे कामगार काही दिवसापूर्वी तेथे कामास गेले होते परंतु त्यांनी काम केले नाही आता दोन दिवसात आम्ही काम पूर्ण करू

**प्रतिकिया :-ग्रामसेवक विंचूर रवींद्र धुंदाळे**

# मराठमोळी वैष्णवी पाटील थेट जागतिक कुस्ती स्पर्धेत

## मनसेचा अभिमान; खेळात नवचैतन्याचा श्वास

**दैनिक युवक आधार**
निलेश फुंडे रेवदंडा

कल्याणची शौर्यवान लेक आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी आमदार राजू पाटील यांनी वैष्णवी पाटील हिची झाग्रेब, क्रोएशिया येथे होणाऱ्या जागतिक मॅट कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाल्याने राज्यभरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मनगटातील रग, बुद्धीची धार, आणि चातुर्याचा मिलाफ असलेल्या या रांगड्या खेळात वैष्णवीने तिच्या खेळीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. मराठी मुलींच्या कणखरपणाचं आणि चिकाटीचं जिवंत उदाहरण ठरलेली वैष्णवी आता जागतिक पातळीवर भारताचं आणि महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करणार आहे, ही गोष्ट प्रत्येक मराठी मनाला उभारी देणारी आहे.

मनसेकडून वैष्णवीला मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या असून, पक्षाच्या वतीने सांगण्यात आले की *"वैष्णवी, तुझ्या परिश्रमांचा आणि जिद्दीचा आम्हाला अभिमान आहे. तुझा संघर्ष आणि मेहनतीचा प्रवास महाराष्ट्रातील प्रत्येक मुलीला नवसंजीवनी देणारा आहे. जागतिक स्पर्धेत तू निश्चितच विरोधकांना चितपट करून दाखवशील, याची आम्हाला खात्री आहे."* वैष्णवीच्या या ऐतिहासिक निवडीमुळे मुलींमध्ये आणि युवकांमध्ये खेळाबद्दल आवड, हुरूप आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली आहे. तिच्या प्रेरणादायी यशामुळे अनेक कुटुंबांमध्ये आता खेळाकडे करिअर म्हणून पाहण्याचा दृष्टीकोन तयार होतो आहे.ही केवळ एक वैयक्तिक निवड नाही, तर ही आहे मराठी परंपरेतील कणखरता, कष्टांची पराकाष्टा आणि यशाच्या शिखराकडे नेणारी अस्सल प्रवृत्तीची मान्यता.कल्याणकरांची वैष्णवी आता भारताचे स्वप्न घेऊन जागतिक आखाड्यात उतरणार आहे, आणि तिच्या या लढ्याला अख्खा महाराष्ट्र पाठीशी आहे.



# सख्ख्या बहिणींनीकडून वृद्धेस लुटण्याचा प्रयत्न

## पोलिसांच्या वेळीच कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

विंचुर :-दि.५ ऑगस्ट २०२५ :- लासलगाव ता. निफाड येथे वयोवृद्ध महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावणाऱ्या दोन महिलांपैकी एका महिलेस लासलगाव पोलिसांनी अटक केली आहे. पत्रकार उमेश पारीख यांच्या तत्परतेमुळे आणि पोलिसांच्या वेळीच कारवाईमुळे हा गुन्हा उघडकीस आणण्यात यश आले आहे.

दि. ४ ऑगस्ट रोजी दुपारी अडीचच्या सुमारास लासलगावच्या बाजारतळा जवळील सुकेणकर चाळीत ही घटना घडली. इंदुमती दत्तात्रय काळे (वय ७५) या वयोवृद्ध महिला घरी एकट्या होत्या. त्यावेळी दोन महिलांनी घरात प्रवेश केला आणि "केळी खा" असा बहाणा करत प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न केला. इंदुमतीबाईंनी नकार दिल्यावर एका महिलेनं बाहेर गस्त ठेवली आणि दुसऱ्या महिलेनं घरात घुसून त्यांच्याशी झटापट करत त्यांच्या गळ्यातील सुमारे २८ हजार रुपये किमतीची पोत हिसकावली आणि दोघी घराबाहेर पळाल्या.

घटनेचा आवाज ऐकून शेजारीच राहणारे टीव्ही ९ चे पत्रकार उमेश पारीख यांनी तात्काळ लासलगाव पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी स.पो.नि.भास्करराव शिंदे यांना माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.नि.सांळुखे, पो.हवा.निचळ, गोसावी, म.पो.हवा.कदम, पो.शि. तळेकर आदींच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. उमेश पारीख यांच्या मदतीने पोलिसांनी तत्काळ कारवाई करत छाया आकाश कुऱ्हाडे (रा. सुमतीनगर, लासलगाव) हिला अटक केली. तपासा दरम्यान तिने गुन्ह्यातील दुसरी महिला तिची सख्खी बहीण पूजा प्रविण कुऱ्हाडे असल्याची कबुली दिली असून ती सध्या फरार आहे. इंदुमती काळे यांचा मुलगा राजेंद्र काळे यांच्या तक्रारीवरून लासलगाव पोलिस ठाण्यात छाया आणि पूजा कुऱ्हाडे यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०९ (४), ३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणाचा तपास पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# "अजित म्हामुणकर यांच्या नेतृत्वाखाली झोपडपट्टी पुनर्वसनासाठी बैठक – नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद"

**दैनिक युवक आधार**
**- किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

**मुंबई,** : जोगेश्वरी (पूर्व) येथील स्मशान टेकडी परिसरात आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तरुण नेते व उद्योजकांच्या नेतृत्वाखाली झोपडपट्टी पुनर्वसनासंदर्भात एक महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. बैठकीत स्मशान टेकडी परिसरातील रहिवाशांच्या समस्या, पुनर्वसनाच्या गरजा आणि त्यासाठीचे उपाय यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. विविध मतदार संघातील कार्यकर्ते आणि स्थानिक सामाजिक कार्यकर्ते यांचाही या बैठकीस सक्रिय सहभाग होता. बैठकीत खालील प्रमुख पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते: 1. भाई घाडीगावकर 2. बाबू मांजरेकर 3. राकेश शुक्ला 4. विनु गायकवाड 5. संतोष गिरी 6. विजय विश्वकर्मा 7. विजू मुणगेकर 8. अमर मोरे 9. दिलीप ओबळे 10. सुनील राजपकर 11. शैलेन्द्र तावडे 12. रविंद्र मोंडे 13. ज्ञानेश सौदाळकर 14. प्रदीप मिश्रा 15. नितेश सिंह 16. पशुपति सिंह 17. नितिन पाटिल आदी मान्यवर उपस्थित होते या बैठकीतून झोपडपट्टी पुनर्वसनासाठी अधिक ठोस उपाययोजना राबविण्याचा निर्धार करण्यात आला असून लवकरच यावर कार्यवाही सुरू केली जाईल, असे आयोजकांनी सांगितले.









# दारव्हा येथील घटने संदर्भात घाटंजी येथील भोई समाजाच्या वतीने तहसिलदारांना निवेदन

**दैनिक युवक आधार -**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

घाटंजी : दारव्हा जि. यवतमाळ येथील आठवडी बाजारात नेहमीप्रमाणे मासे विक्रीसाठी आलेल्या भोई समाज बांधवांना मासे विक्रीस मनाई करणाऱ्या व या ठिकाणी मासे विक्री केल्यास जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी घाटंजी तालुका भोई समाजाच्या वतीने श्री निरज भूमाजी मन्ने घाटंजी यांनी केली आहे.

या प्रकरणातील आरोपींनी दिलेल्या धमकीमुळे घाबरलेल्या भोई समाज बांधवांनी आठवडी बाजारातील मासे विक्री बंद केली आहे. मासे विक्री हा समाजाचा पारंपारिक व्यवसाय असल्याने व उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नसल्याने संबंधित भोई समाज बांधवांची आर्थिक कोंडी झाल्याने याचा थेट परिणाम त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहावर झालेला आहे.

त्यामुळे भोई समाज बांधवांना योग्य त्या सुरक्षेची हमी देऊन मासे विक्रीचा पारंपारिक व्यवसाय पुनःश्च सुरक्षित करण्यात यावा व दोषींवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अन्यथा भोई समाज रस्त्यावर उतरून



आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही. तसेच घाटंजी तालुका भोई समाज दारव्हा येथील अन्यायग्रस्त समाज बांधवांना न्याय मिळेपर्यंत त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील असेही मा. तहसीलदार साहेब घाटंजी यांना निवेदनातून आश्वासित केले आहे.

निवेदन देतेवेळी भोई समाज युवा संघटना घाटी-घाटंजी अध्यक्ष श्री निरज मन्ने यांच्यासह गंगा मच्छिमार सहकारी संस्था घाटी-घाटंजी अध्यक्ष आश्विन सातघरे, नितेश बावणे, अजय गिनगुले, जयवंता गिनगुले, विनोद बावणे, प्रदीप बावणे नागोराव गिनगुले, पुरुषोत्तम सातघरे, निकेत गिनगुले, संदीप बावणे, ईश्वर बावणे, भोला बावणे, दुर्गेश गिनगुले, मंगेश मोहिजे व इतर समाज बांधव तहसील कार्यालयात उपस्थित होते..

# पत्रकारांवरील हल्ल्याचा निषेध ; व्हाईस ऑफ मिडिया मालेगाव च्या वतीने तहसीलदारांना निवेदन.!

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

**मालेगाव :-** मागच्या तीन दिवसाअगोदर महाराष्ट्रातील नेवासा (जि. अहमदनगर) येथे पत्रकार शंकर नाबदे यांच्यावर व त्यांच्यासोबत असलेल्या इतर तीन पत्रकार बांधवांवर स्थानिक पातळीवर भ्याड व अमानुष हल्ला करण्यात आला. त्याचप्रमाणे अकोला जिल्ह्यातील पत्रकार सज्जाद हुसेन व त्यांच्या कुटुंबीयांवरही हल्ला करण्यात आला. या भ्याड हल्ल्यांच्या निषेधार्थ दि. ५ ऑगस्ट २०२५ रोजी मालेगाव तालुका व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेच्या वतीने नेवासा व अकोला येथील पत्रकारांवर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ मंगळवारी मालेगाव तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. व्हॉईस ऑफ मीडिया या पत्रकार संघटनेच्या वतीने या दोन्ही घटनांचा तीव्र निषेध व्यक्त करीत नेवासा व अकोला येथील पत्रकारांवर झालेल्या हल्ल्यांबाबत तत्काळ गुन्हे दाखल करावेत, दोषींवर कठोर कारवाई करावी. पत्रकारांना संरक्षण द्यावे. हल्ल्यांची तातडीने स्वतंत्र चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, महाराष्ट्रातील पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी विशेष पथक व हेल्पलाइन स्थापन करावी, पत्रकार संरक्षण कायद्यास तातडीने अंमलात आणण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी केली आहे. संपूर्ण राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष भागवत मापारी, मालेगाव तालुकाध्यक्ष अजय चोथमल, साप्ताहिक विंगचे तालुकाध्यक्ष गणेश लहाने, उपाध्यक्ष आनंता कुटे, सचिव सचिन साठे, कार्याध्यक्ष संतोष गिरडे, सहसंघटक भारत आंधळे, सदस्य - विलास गुडदे, राहूल वानखेडे, इमरान सय्यद आदि पत्रकार बांधव उपस्थित होते.

# स्वतःच दुःख विसरून इतरांना हसवणारा बहुरूपी नामदेव शिंदे

**दैनिक युवक आधार**
**बाळासाहेब रकटाटे आष्टी प्रतिनिधी**

लोकांच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्यासाठी स्वतःचे दुःख झटकून टाकणाऱ्या बहुरूपी नामदेव बाबासाहेब शिंदे यांची जीवनकहाणी प्रत्येकाच्या मनाला चटका लावणारी आहे. सध्या ग्रामीण भागात गावोगावी फिरून पारंपरिक बहुरूपी कला सादर करणारे नामदेव शिंदे हे केवळ कलाकार नाहीत, तर ते हसण्यामागील वेदना उलगडणारे खरे जीवनकवी आहेत.नेवासा तालुक्यातील घोडेगाव हे त्यांचे मुळगाव. . शिक्षण फक्त दुसरीपर्यंतच झाले. गरिबी, परिस्थितीची अडचण, आणि आई मजुरीला जाणारी – हे चित्र त्यांच्या बालपणात कायम होतं. पण या सगळ्या अडचणींना सामोरे जात त्यांनी जीवनात हसवण्याची भूमिका स्वीकारली. आज ते गावोगावी बहुरूपी वेष परिधान करून लोकांचे मनोरंजन करतात. "साहेब, काल म्हणे तुम्ही बैलगाडीच्या आरशाच्या काचा फोडल्या... आता गुन्हा दाखल झाला आहे!" अशा विनोदी संवादांनी लोकांना क्षणभर सगळं विसरायला लावतात. एक गाव, एक चौक, एक गर्दी, आणि मधोमध उभा विनोदी बहुरूपी – हीच त्यांची रोजची लढाई.

दररोज वेगवेगळ्या गावांत जाऊन चार-पाचशे रुपये मिळवले जातात. तेच त्यांचं आणि त्यांच्या कुटुंबाचं पोट भरण्याचं साधन. सध्या ते तिसगाव येथे वास्तव्यास आहेत. "आम्ही नाही शिकू शकलो, पण आमच्या मुलांनी शिकावं, मोठं व्हावं, हीच आयुष्यातली खऱ्या अर्थाने मोठी स्वप्नं आहेत," असं ते सांगतात. काही लोक त्यांच्या कलेचं कौतुक करतात, पैसे, धान्य देतात. पण काही वेळा अपमानास्पद बोलणीही ऐकावी लागतात. "पण आम्ही हसवतो... आणि लोक हसतात. तेव्हा वाटतं की आपलं दुःख विसरण्याची आणि दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हसू उमटवण्याची ताकद अजून जिवंत आहे," असं सांगताना त्यांच्या डोळ्यांत जणू जिवनसंघर्षाची कहाणी लपलेली असते. लोककलेच्या माध्यमातून समाजमन जपणाऱ्या अशा कलाकारांना शासनाने आणि समाजानेही प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. कारण त्यांच्या हसण्यामागे लपलेली ही हळवी कहाणी, आपल्याला एक नवी जाण देऊन जाते



# वक्तृत्व स्पर्धेतून विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाची देणगी !

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर शाळा उलवे येथे शाळा अंतर्गत फेरी उत्साहात संपन्न !

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा" या उपक्रमाअंतर्गत उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर शाळा येथे शाळा अंतर्गत फेरी अत्यंत उत्साहात पार पडली. यावेळी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने भाषण सादर करत आपल्या विचारांची प्रभावी मांडणी केली. स्पर्धेतील विषयांमध्ये माझं स्वप्न, शिकल्यामुळे काय फरक पडतो, जर मी जादूगार असतो, शिक्षणाचं महत्त्व, इंटरनेट – वरदान की शाप?, प्लास्टिक मुक्त भारत, मोबाईल नसते तर? अशा रंजक आणि विचार करायला लावणाऱ्या संकल्पनांचा समावेश होता. या फेरीतून प्रत्येक इयत्तेमधून ३ विद्यार्थी निवडून ते पुढील आंतरशालेय फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक भावना निर्माण




झाली असून, भाषिक कौशल्यासह त्यांचा आत्मविश्वासही वाढीस लागला आहे. कोशिश फाउंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रेरणेतून राबवले जाणारे हे वक्तृत्व स्पर्धा उपक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. या स्पर्धेच्या आयोजनासाठी शिक्षक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पालकांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी शिक्षकांनी विशेष मार्गदर्शन सत्रे घेतली.